# पंडित जवाहरलाल नेहरू यांचे परराष्ट्रीय धोरण विषयक विचार

**डॉ. योगिराज. एस. उरकुडे**
राज्यशास्त्र विभाग
भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा

---

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांचा जन्म 14 नोव्हेंबर 14 नोव्हेंबर1889 ला अलाहाबाद येथे झाला पंडित नेहरूवर महात्मा गांधींचा प्रभाव पडला त्यांचा जन्म अतिशय श्रीमंत घरात झाला. राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभावना यांचे विचार वडीलाकडूनच मिळाले नेहरूंनी आपले शिक्षण इंग्लंडमध्ये पूर्ण केले शिक्षणासोबतच त्यांना राजकारणातही आवड निर्माण झाली बॅरिस्टर असूनही ते वकिलीच्या व्यवसायात रमले नाही आंतरराष्ट्रीय घडामोडी कडे ते आकर्षित झाले स्वतंत्र भारताच्या ध्येयाने ते प्रेरित झाले स्वातंत्र्य चळवळी त्यांनी भाग घेतल्यामुळे अनेक वेळा ते तुरुंगात गेले लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते आपल्या विचारांनी संपूर्ण जगात त्यांची ओळख निर्माण झाली . आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्याचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले त्यांचे व्यक्तिमत्व अलौकिक आणि संमोहक होते . भारतीय जनतेने नेहरूनवर खूप प्रेम केले. आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेल्या या महान भारतीय नेत्याचे निधन 27 मे 1964 ला झाले

**परराष्ट्र धोरण विषयक विचार :-**

आंतरराष्ट्रीय राजकारण हा पंडित नेहरूंच्या अतिशय आवडीचा विषय होता स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण विषयक रूपरेषा त्यांनी स्वातंत्र्यापूर्वीच निश्चित केली स्वतंत्र भारताचे ते पहिले पंतप्रधान झाल्यानंतर ते भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार बनले भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे त्यांनी निश्चित केली ती एवढी विचारपूर्वक ठरविण्यात आली की आज पर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणात फारसा बदल झाला नाही.

**परराष्ट्र धोरणाचा अर्थ :-**

विदेश नीति किंवा परराष्ट्र धोरण म्हणजे एखाद्या देशाने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भात स्वीकारलेली व्यापक भूमिका होय तसेच दुसऱ्या देशासोबत निश्चित करावयाचे संबंध याविषयीची भूमिका होय.

**विदेश नीति किंवा परराष्ट्र धोरणाची प्रमुख तत्वे**

**१) साम्राज्यवाद व वसाहत वादाला विरोध :-** इंग्लंडच्या साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला बळी पडलेल्या देशापैकी भारत हा एक देश होता गुलामगिरीच्या वाईट अनुभवामुळे साम्राज्यवाद आणि वसाहतवाद संपूर्ण जगातून नाहीसा झाला पाहिजे अशी नेहरूंची भूमिका होती साम्राज्यवादाचा अंत झाल्याशिवाय मानव जातीचा विकास होणार नाही आणि जगात शांतता राहणार नाही असे त्यांचे मत होते गुलामगिरीत असणाऱ्या देशांच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणे हे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र होते.

**२) आंतरराष्ट्रीय शांतता :-** नेहरूंनी जागतिक शांततेचा पुरस्कार केला शांततावाद ही भारताची श्रद्धा आहे युद्धाच्या संकटापासून संपूर्ण मानव जातीचे रक्षण करणे आणि जगात शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात भारताचे महत्त्वाचे योगदान आहे राष्ट्रा राष्ट्रातील वादग्रस्त प्रश्न वाटाघाटी तडजोड लवाद अशा मार्गाचा अवलंब करून सोडवावे ही भारताची भूमिका आहे भारताच्या विदेश नीतीचे उद्दिष्ट म्हणून शांतता व मैत्री यासंबंधाचा पुरस्कार केला

**३) पंचशील करार :-** चीन सोबत संघर्ष वाढू नये म्हणून चीनविषयक धोरण स्वीकारताना चीन दुखावला जाणार नाही या भूमिकेचा स्वीकार केला संयुक्त राष्ट्र संघाचे चीनला सदस्यत्व मिळावे यासाठी भारताने प्रयत्न केले भारताच्या या राजकीय भूमिकेमुळे भारत व चीन या दोन्ही देशात वाटाघाटींना अनुकूल वातावरण तयार झाले 1954 मध्ये चीनचे पंतप्रधान भारत भेटीवर आले हा काळ भारत चीन मैत्रीच्या युगाचा प्रारंभ होण्याचा काळ होता भारत व चीन यांच्यात 28 जून 1954 ला पंचशील करार झाला त्या करारातील प्रमुख तत्व पुढील प्रमाणे आहेत

१) परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेचा व सार्वभौमत्वाचा आदर करणे
२) परस्परांवर आक्रमण न करणे
३) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे
४) परस्परांना लाभदायक संबंध प्रस्थापित करणे
५) शांततामय सहजीवन तत्त्वावर दृढ विश्वास

भारताने चीन सोबत पंचशील करार केला असतानाही चीनने 1962 ला भारतावर आक्रमण केले आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विश्वास घात केला तरी भारताचे परराष्ट्र धोरणातील शांततामय सहजीवन आणि सह अस्तित्व या तत्त्वाचा जगावर आजही प्रभाव आहे.

**४) अलिप्ततावाद :-** अलिप्ततावाद ही दुसऱ्या महायुद्धानंतर ची संकल्पना आहे त्याचे जनक पंडित नेहरू आहेत भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू योगेशला वियाचे अध्यक्ष टिटो आणि इजिप्त नेते  नासेर हे तीन प्रमुख नेते एकत्र आले आणि त्यांचे अलिप्ततेच्या धोरणावर एकमत झाले आणि अधिक्ततावादी देशांची संघटना निर्माण केली.

संपूर्ण जग दोन गटात विभागले आणि जगात शीतयुद्धाचे वातावरण तयार झाले असताना भारताने कोणत्याही गटात सहभागी न होता आपली वेगळीच भूमिका स्वीकारली ती म्हणजेच अलिप्तता किंवा तटस्थता होय

**तटस्थतेचा अर्थ :-** जगात शांतता नांदावी महासत्तेमधील तणाव कमी व्हावा महायुद्ध पुन्हा होऊ नये हा तटस्थतेच्या धोरणामागचा उद्देश होता. जगातील कोणत्याही गटात सहभागी न होता एक स्वतंत्र शक्ती म्हणून जगात शांतता नंदावी आणि परस्पर सहकार्य यासाठी कार्य करणे हा तटस्थतेच्या धोरणाचा अर्थ आहे

अशाप्रकारे भारताच्या परराष्ट्र धोरणात नेहरूंचे योगदान महत्त्वपूर्ण आहे

**संदर्भग्रंथ**

- प्रा.रा.ज लोटे "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स ,नागपूर.
- २)प्रा. अरविंद शृंगारपुरे, "भारतीय राजकीय विचार", श्री मंगेश प्रकाशन ,नागपूर.
- डॉ. भा. ल.भोळे, "भारतीय राजकीय विचार", पिंपळापुरे प्रकाशन ,नागपू